जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट दिनांक - ०८/०६/२०२३**

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर

## श्री. ज्ञानेश्वर महाराज व तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे अनुषंगाने पोलीस तसेच सर्व शासकिय विभागांच्या अधिका-यांची आढावा बैठक

विश्रांतवाडी पोलीस स्टेशन येथे दिनांक ०६/०६/२०२३ रोजी पोलीस उपायुक्त परिमंडळ ०४ कार्यक्षेत्रात आगामी श्री.संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २०२३ व श्री.संत तुकाराम महाराज पालखी सोहळा २०२३ अनुषंगाने आढावा बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीस ,मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री. रंजन कुमार शर्मा, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०४, पुणे शहर श्री शशिकांत बोराटे, ,मा.सहा. पोलीस आयुक्त खडकी विभाग, श्रीमती आरती बनसोडे पुणे शहर मा.उपायुक्त सो मनपा पुणे शहर श्रीमती किशोरी शिंदे मा. सहा. पोलीस आयुक्त विशेष शाखा, पुणे शहर, श्री राजेंद्र साळोखे वरीष्ठ पोलीस निरीक्षक विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, वरीष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन, वरीष्ठ पोलीस निरीक्षक खडकी पोलीस स्टेशनचे ,पोलीस निरीक्षक येरवडा वाहतुक विभाग, पोलीस निरीक्षक खडकी वाहतुक विभाग, तसेच पुणे, महानगरपालिकेचे सहा. आयुक्त येरवडा क्षेत्रिय कार्यालय पुणे,सहा.आयुक्त विभागीय घोले रोड पुणे, आरोग्य निरीक्षक, ज्युनिअर इंजिनिअर, अति. कार्यकारी अधिकारी अभियंता विश्रांतवाडी विभाग, सहा. अभियंता विश्रांतवाडी विभाग , मा. आरोग्य प्रमुख पुणे मनपा, मुख्य अग्निशामक अधिकारी अग्निशामक विभाग तसेच पालखी स्वागत कक्षाचे प्रतिनिधी सतीश म्हस्के व पालखी विसावा ठिकाण दत्त मंदिर आळंदी रोड कडील प्रतिनिधी अजय सावंत हे उपस्थित होते.

बैठकी दरम्यान खालील मुद्दयांवर चर्चा करुन सुचना देण्यात आलेल्या आहेत.बोपखेल फाटा ते संगमवाडी पालखी मार्गावर एकुण १६ ठिकाणी ४८ टॉयलट मोबाईल ठेवल्या जातील.पालखी मार्गावर ठिकठिकाणी पिण्याचे पाण्याचे सोय केली जाईल.पालखी मार्गावरील राडा रोडा काढावा तसेच रस्त्यावरील खड्डे बुजवुन घ्यावेत, सर्व पालखी मार्ग स्वच्छ करुन घेणे.मच्छी मार्केट येथील परिसर आरोग्य विभागाकडुन स्वच्छ धुवुन घेणे.पालखी मार्गातील झाडांचे फांदया कापुन घेणे.सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातुन पालखी मार्गावर कोणीही विनापरवाना कमानी उभारणार नाही याची दक्षता घेणे.पालखी विसाव्याचे ठिकाणी फायर ब्रिगेडची गाडी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेसह सह हजर ठेवणे. व वारक-यांसाठी ॲम्ब्युलन्स. स्टाफ सह, फिरता दवाखाना ठेवणे.पालखी विसावा ठिकाणी वॉच टॉवर उभारणे.पालखी विसावा ठिकाणी व मार्गावर स्वयंसेवक नेमणे.पालखी मार्गाची व विसावा ठिकाणची एक दिवस आगोदर बीडीडीएस मार्फत तपासणी करुन घेणे.पालखी मार्गावर पालखी आगमन स्वागत कक्ष , पालखी विसावा ठिकाण येथे सीसीटीव्हि कॅमेरे तात्काळ बसवणे.विसाव्या ठिकाणी आरोग्य डॉक्टरांची टीम ठेवणे.सरकारी व खाजगी दवाखाने येथे आपत्कालीन परिस्थितीमध्ये व्यवस्था करणे.बोपखेल फाटा ते संगमवाडी पालखी मार्गास जोडणारे गल्ली/ बोळ / रस्ते येथे उत्तम दर्जाची बॅरिकेटींग करणे. तसेच विसावा ठिकाण येथे ही बॅरेकिटींग करणे.एम एस ई बी चे अधिकारी व कर्मचारी यांनी पालखी मार्गाची पाहणी करुन लोबंत असलेल्या तारा उघडे डीपी बंद करावे तसेच दिनाक ११/०६/२०२३ ते दि. १२/०६/२०२३ दरम्यान लोडशडिंग होणार नाही याबाबत दक्षता घेऊन पालखी मार्गावर एक टीम हजर ठेवणे. दिनांक १२/०६/२०२३ रोजी पालखी मार्गावरील सर्व प्रकारची मटण /चिकन/फिश तसेच दारु दुकाने बंद ठेवणे.पालखी मार्गावरील मेट्रोचे काम बंद ठेवणे.

पालखी विसावा व मार्गावर महत्त्वाचे अधिकारी यांचे मोबाईल क्रमांचे बोर्ड लावणे.अन्न व औषध प्रशासन यांचेकडुन पालखी मार्गावर फराळ /अन्नदान वाटप करणारे स्टॉलची फुड इन्सपेक्टर यांची नेमणुक करुन तपासणी करुन घेणे.ट्राफिक डायर्व्हेशन बाबत माहिती प्रसारित करणे. तसेच पालखी मार्गावर कोणतेही वाहने पार्किंग होणार नाही याबाबत काळजी घेणे. विश्रांतवाडी चौक येथील स्काय वॉक बंद करुन घेणे.पालखी मार्गस्थ झाल्यानंतर आरोग्य विभाग पालखी मार्ग स्वच्छ करुन घेतील त्यासाठी ४५० कर्मचारी उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

पालखी बंदोबस्त दरम्यान सर्व विभागाने समन्वय साधुन काम करावे ट्राफिक बंदोबस्ताचे योग्य ते नियोजन करणे एटीसी चे अनुषंगाने सर्तक राहुन सर्वांना जागृक ठेवणे व सुचना देणे.पालखी सोबत व्हिडीओ कॅमेरो ठेवणे तसेच विसाव्याचे ठिकाणी दत्त मंदिरावर दोन व्हिडीओ कॅमेरे ठेवणे .विसाव्याचे ठिकाणचे तंबु मजबुत बनवुन घेणे.ड्रोन कॅमेरे ची व्यवस्था करणे. कोणतेही आपत्कालील परिस्थिती निर्माण होऊन चेंगराचेंगरी होणार नाही याबाबत काळजी घेणे.पालखी बंदोबस्तचे अनुषंगाने संबधितीत सर्व विभागचे अधिकारी व कर्मचारी यांचा व्हाटस अप ग्रुप बनविणे.

वरील मुद्दयांवर चर्चा करुन संबधित विभाग प्रमुखांनी तात्काळ पुर्तता करुन घेणेबाबत कळविण्यात आले आहे.